# घनसावंगी नगरपंचायत, घनसावंगी

## प्रशासकिय इमारत, घनसावंगी जि. जालना

e-mail-npghansawangi@gmail.com 02482 271787

जा.क्र./घनपं/स्थापत्य वि-02/218 दि. 15/5 /2026

## बांधकाम विभाग

ई-निविदा सुचना क्रमांक- - सन 2026-2027 (पहिली वेळ)

घनसावंगी नगर पंचायतीने **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) व नागरी दलितेत्तर योजना (जिल्हास्तर) सन २०२५-२६ अंतर्गत** खालील प्रमाणे सार्वजनिक बांधकामे हाती घेणे करीता ई-निविदा बी-1 फॉर्म मध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

ई-निविदा बाबतचा सविस्तर तपशील http;//www.mahatendars.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | 1% इसारा रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | कोरी निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत नृसिंह मंदिर परिसरात सोलार हायमास्ट बसविणे. (दक्षिण व उत्तर बाजु) | 55,00,000/- | 55,000/- | वर्ग-4 व त्यावरील | 360 | 4,000/- |
| 2 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत तुकाई मंदिर परिसरात सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 3 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत वार्ड क्र.11 मधील मारोती मंदिर समोरील चौकात सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 4 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत मुस्लीम कब्रस्तान मध्ये सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 5 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत शादीखाना परिसरातील किचन शेड जवळ सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत जुनी ग्रामपंचायत समोरील चौकात सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 7 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत सरकारी दवाखान्याजवळील स्मशानभुमी मध्ये सोलार हायमास्ट बसविणे. | 35,00,000/- | 35,000/- | वर्ग-4 व त्यावरील | 360 | 3,000/- |
| 8 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत नविन डंपिग ग्राऊंड परिसरामध्ये सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 9 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत गणपती मंदिर परिसरात सोलार हायमास्ट बसविणे. | | | | | |
| 10 | नगर पंचायत घनसावंगी हद्दीत नृसिंह मंदिरकडे जाणाऱ्या स्मशानभुमीत सोलार हायमास्ट बसविणे. (दक्षिण व उत्तर बाजु) | | | | | |

**अटी व शर्ती:-**

1. सदर संपुर्ण निविदा ऑनलाईन पध्दतीने संगणकिय आज्ञावली प्रमाणे होईल. सदर निविदा संदर्भातील निविदा सुचना प्रसिध्दी, सुचना शुध्दीपत्रके ई. माहीती http;//www.mahatendars.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
2. वरील कामाची ईसारा रक्कम व निविदा किंमत ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची आहे.

**तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्रं.01)**

1. **वरील कामाची ईसारा रक्कम व निविदा किंमत ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेल्या रक्कमेची छायांकित प्रत.**
2. **सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासनमान्य विदयुत अभियांत्रिकी कामाचे नोंदणीकृत रजिस्ट्रेशन (वर्क कॅप्यसिटी कामांच्या रककमे इतकी असणे आवश्यक )**
3. Details Of Technical Staff -कंत्राटदारामार्फत साईट इंजिनिअर स्ट्रक्चरल डिजाईनर असणे बाबत व कामादरम्यान साईटवर उपस्थिती राहणे बाबत हमीपत्र देणे बाबत.
4. GST प्रमाणपत्र, IT- (मागील 03 वर्षापुर्वीचे) शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्डची स्कॅन केलीली प्रत,
5. EPF नोंदणी प्रमाणपत्र व चालु EPF Challan Copy (ESIC असल्यास प्राधान्य)
6. Previous Similar Work Completion Certificate **(तत्सम कामाचा अनुभव)**.
7. Work Done Certificate **व तत्सम कामाच्या** 75% Work Capacity
8. **नगरपंचायतने निविदेत नमुद असलेल्या कामा सारख्या काम केल्याचा किमान एक कार्यादेश व अनुभवाचा दाखला**
9. सोबत दिलेले **परिशिष्ट**-1 मधील माहिती
10. सोबत दिलेले परिशिष्ट-2 व 3 मधील माहिती (बॉण्डवर)
11. स्थायी निर्देश 36 मधील परिशिष्ट-अ प्रतिज्ञापत्र (बॉण्डवर)

12. काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (बॉण्डवर)
13. आर्थीक क्षमता सिध्द करणारे कागदपत्र
14. Bid Capacity (CA कडुन प्रमाणित करुन)
15. कामाच्या निगडीत Machinery Details सोबत नोटराईज्ड करारानामा
16. संबधीत निविदाधारक / कंत्राटदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन कामाच्या ठिकाणची पाहणी करुन स्वत:जिओ टॅग फोटो काढुन न,पं, कार्यालयामार्फत प्रमाणित करुन निविदेसोबत अपलोड करणे बंधनकारक राहील,

**आर्थीक लिफाफा (लिफाफा क्रं.02)**

a) ठेकेदाराने आपले दर विहित BOQ मध्ये योग्य त्या जागी भरुन सदरची BOQ लिफाफा क्रं.02 मध्ये अपलोड करावा. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या निविदेचा दर इतर कोठेही नमुद करण्यात येऊ नये.

3. कामासंबधी अधिक माहिती नगरपंचायत घनसावंगी कार्यालयातील संबधीत विभागाकडे कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसा खेरीज मिळु शकेल.
4. तांत्रिक मान्यतेतील सर्व अटी व शर्ती तसेच प्रशासकीय मान्यतेतील सर्व अटी व शर्ती बंधनकाराक राहतील.
5. ठेकेदाराने आपले निविदेतील दर हे सर्व करासहीत देण्याचे आहे.ठेकेदाराच्या होणाऱ्या देयेकातुन **शासनाचे सुचने नुसार** सर्व्हिस टॅक्स, आयकर, GST व इतर सर्व शासकिय कर व उपकर कपात करण्यात येतील. शासकीय कर पध्दतीने बदल झाल्यास शासन निर्णयानुसार निर्णय घेतले जातील.
6. ठेकेदाराने कामाकरीता लावलेल्या मनुष्यबळास नगरपंचायतच्या आस्थापनेवर कोणत्याही स्वरुपाचा हक्क प्राप्त होणार नाही. तसेच काम करताना दुखापत अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. या कामी कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई मिळणार नाही.
7. सा.बां.विभागाच्या दि.12/04/2017, दि.29/06/2017 व दि.21/09/2017 रोजीच्या शासन निर्णयातील नियमानुसार कंत्राटदारकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा तांत्रिक पात्रतेमध्ये कंत्राटदाराला अपात्र करण्यात येईल.
8. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयानुसार निविदा भरल्यापासुन 72 तासाच्या आत हार्डकॉपी घनसावंगी नगर पंचायत कार्यालय मध्ये सादर करणे अनिवार्य आहे.
9. कंत्राटदार यांचे तांत्रिक प्रतिनिधी यांना कामावर उपस्थिती अनिवार्य आहे. कामावर कंत्राटदारामार्फत तांत्रिक प्रतिनिधी नसल्यास सदर कंत्राट / कार्यारंभ आदेश रद्द करण्यात येईल.
10. शासन निर्णयानुसार कामाकरिता भाववाढीचे कलम लागु राहणार नाही.
11. कंत्राटदारास सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास विभाग तसेच इतर केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाचे सर्व कायदे नियम त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.
12. ठेकेदाराकडे EPF नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे व त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगाराचे EPF/ESIC इत्यादी भरणा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. तसेच EPF/ESIC संबधी सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची असेल.
13. मंजुर निविदा धारकाने विहित नमुन्यात योग्य रक्कमेच्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. ठेकेदाराने विहित वेळेत करारनामा करुन न दिल्यास सदर ठेकेदाराची बयाणा रक्कम जप्त करुन ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात येईल.
14. निविदेतील सर्व वा कोणत्याही अटी व शर्ती पुर्ण न करणा-या ठेकेदाराच्या निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील. तथा नमुद अटी व शर्ती व्यतेरिक्त सादर केलेल्या इतर कोणत्याही अटीवर अधारित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
15. ई-निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकरण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे.
16. संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना हे निविदा संचाचा एक भाग राहील.

17. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा / वाद निर्माण झाल्यास त्याबाबत नगरपंचायतचा निर्णय अंतिम राहील.
18. ठेकेदाराने नगर पंचायत कडुन सांगितलेले काम समाधानकारक पुर्ण करणे बंधनकारक असुन याबाबत दिलेल्या **सुचनांचे तंतोतंत पालन** करणे आवश्यक आहे.
19. ठेकेदाराने ठेका अर्धवट सोडल्यास अथवा दिलेल्या सुचनांचे उल्लंधन होत असल्याचे निदर्शनास आल्यास काम करायचे नाही असे समजुन ठेका एक तर्फा रद्द करण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखुन ठेवला आहे. तसेच संबधीताची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. याबाबत ठेकेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. याबाबत नगरपंचायत एक आठवडयाची नोटीस देईल नोटीसी नंतर आपला ठेका निलंबीत समजुन लगेचच दुस-या ठेकेदाराकडुन कामाची पुर्तता करुन घेतली जाईल व त्यातुन होणारे नुकसान संबधीत ठेकेदाराकडुन वसुल केले जाईल.
20. ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचारी / मजुराचा पगार किमान वेतन अधिनियम कायद्यानुसार ठेकेदाराने स्वत भागविणे बंधनकारक राहील. याबाबत नगरपंचायतीची बांधिलकी असणार नाही. तसेच संबधीत कर्मचाऱ्यांचे कामगार किमान वेतन अधिनियमाप्रमाणे देय असणारे इतर फायदे
21. ठेकेदाराकडील कोणत्याही कर्मचाऱ्याने गैर कृत्यास अगर कार्यास नगरपंचायत जबाबदार असणार नाही आणि नगरपंचायत विरुध्द अशा बाबतीत कोणासही दावा सांगता अगर करता येणार नाही जर कोणत्याही कंत्राटी कर्मचाऱ्याने अगर त्यांच्या वारसाने नगरपंचायत विरुध्द दावा अगर दाद मागविल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील.
22. नियम, अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी आवश्यतेनुसार बदल करण्याचे अधिकार नगरपंचायतीने राखुन ठेवले आसुन तो ठेकेदारावर बंधनकारक राहील.
23. ठेकेदार अथवा त्यांचे कर्मचा-याने नागरीक, नगरपंचायत चे पदाधिकारी तथा अधिकारी तसेच कर्मचारी यांच्याशी सौजन्याने वागणे बंधनकारक राहील.
24. या कामी वेळोवेळी आवश्यकतेनुसार सर्व शासकीय भरणा / देणे अगर कागद पत्राची पुर्तता करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी नगरपंचायत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष जबाबदार राहणार नाही.
25. वरील अटी व शर्तीच्या संबधाने काही अडचणी तथा विसंगती उद्भवल्यास यासंबधी शासनाकडील आदेश, परीपत्रके यास अनुसरुन नगरपंचायत किंवा तीचे कायदेशीर सल्लागार यांचे अभिप्राय विचारत घेवुन नगरपंचायतीचा निर्णय अंतीम राहील.
26. GST अधिनियमास अधिन राहुन देयके अदा करतांना GST TDS @ 2% कपात करण्यात येईल.
27. सदर काम असमाधानकारक झाल्यास सदर कामाचा ठेका विनाविंलब तात्काळ रद्द करण्याचे अधिकार नगरपंचायतीने राखुन ठेवला आहे. ठेका रद्द केल्याची कारणे दिली जाणार नाही.
28. कामाची सुरक्षा अनामत रक्कम सुरुवातीला स्वीकृत निविदा रक्कमेचा 3% नगदी स्वरुपात व चालु देयकातुन 7% कपात करण्यात येईल.
29. सदर कामाची निविदा सादर करणाऱ्या ठेकेदारास वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य आहेत असे समजण्यात येईल.
30. कामाची अंमलबजावणी वेळेवर व सुरळितपणे होण्याच्या दृष्टीने नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
31. सदर कामाच्या **दोष दायित्व कालावधी** दरम्यान असलेल्या उणीवा दुरुस्त करुन देणे कंत्राटदारास बंधनकारक असुन त्यासाठी कुठलाही मोबदला कंत्राटदारास अदा करण्यात येणार नाही.
32. अंदाजपत्रका व्यतिरिक्त कुठेल्याही आवाजवी कामासाठी अधिकचे देयके अदा करण्यात येणार नाही. प्रसंगी कंत्राटदारास अतिरिक्त बिलाची मागणी करता येणार नाही.
33. सदर निविदा भरण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंता / MSME यांनी सदर कामासाठी होत असलेली **इसारा रक्कम** भरणे बंधनकारक आहे. तदनंतरच संबधीत सु.बे.अ. हे पात्र असतील.
34. कामाचा दर्जा / गुणवत्ता अयोग्य आढळुन आल्यास कंत्राटदार दंडात्मक कार्यवाहीस पात्र असेल.

35. सदर अभ्यासिकाच्या दर्शनी भागावरती नगरपंचायत निर्देशीत करील असे नामफलक विनामुल्य लावणे कंत्राटदारास बंधनकारक असेल.
36. **निविदे सोबत सादर करण्यात आलेल्या परिशिष्ट-1 व प्रतिज्ञापत्र-अ मध्ये माहिती निविदाकाराने भरणे बंधनकारक राहील.**

(संतोष वाघमारे)
**मुख्याधिकारी**
घनसावंगी नगर पंचायत

# संपर्कासाठी नमुना अर्ज (परिशिष्ट-1)

**प्रति,**

**मा. मुख्याधिकारी साहेब,**
**नगर पंचायत घनसावंगी**
**ता.घनसावंगी जि.जालना**

विषय:- संपर्कासाठी माहिती.

| | |
|---|---|
| निविदधारकाचे / मालक नाव (संस्था / पार्टनरशीप / फर्म / कंपनी) | |
| पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता | |
| कायमचा रहिवास पुर्ण पत्ता | |
| कार्यालय फोन नंबर | |
| संपर्कासाठी मोबाईल नंबर | |
| संपर्कासाठी ई-मेल | |
| पॅन कार्ड नंबर | |
| आधार कार्ड नंबर | |
| GST Number | |

आपला विश्वासू

सही:-

नाव:-

नाव पत्ता:-

मोबाईल नंबर

संस्थेचा शिक्का

(परिशिष्ट-2)

प्रति,
मा. मुख्याधिकारी साहेब,
घनसावंगी नगरपंचायत

विषय:- कामाचे नावः- ------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------

संदर्भ:- आपल्या कार्यालयाची ई-निविदा सुचना

महोदय,

उपरोक्त विषयान्वये व संदर्भान्वये विनंती करतो की,

1. आम्ही ऑनलाईन प्रक्रियेद्वारे आपल्या विनंतीनुसार सदर प्रस्ताव दाखल करत आहोत.
2. आमच्या प्रस्तावामध्ये तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा समाविष्ठ आहे.
3. आम्ही प्रस्तावात नमुद केलेली सर्व माहिती व सर्व कागदपत्रे खरी असुन दिशाभुल करणारी नाही.
4. निविदेतील नमुद सर्व अटी व शर्ती वाचल्या असुन आम्हाल सर्व अटी मान्य आहेत.
5. निविदेतील नमुद कामासंदर्भात जागा, परिस्थिती, वस्तुस्थिती इ आवश्यक प्रत्यक्ष पाहणी आम्ही केली असुन आम्ही सदर कामाची जबाबदारी स्विकारण्यास तयार आहोत.
6. आम्ही सादर केलेली निविदा स्विकारणे आपणावर बंधनकारक नाही.
7. ई-निविदा दरासंदर्भात आवश्यकता भासल्यास वाटाघाटी करण्यास मी / आम्ही तयार आहोत.

आपला विश्वासू

सही:-

नाव:-

नाव पत्ता:-

मोबाईल नंबर

संस्थेचा शिक्का

(परिशिष्ट-3)

प्रति,
मा. मुख्याधिकारी साहेब,
घनसावंगी नगरपंचायत

विषय:- निविदेमधील नमुद असलेल्या कामासारखे केलेल्या मागील 05 वर्षातील एका कामाची माहिती.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | |
| अंदाजपत्रकीय किंमत | |
| कामाची मुदत<br>आरंभ दिनांक<br>समाप्ती दिनांक | |
| प्रत्यक्ष कामाचा तपशील | |
| काम केलेल्या संस्थेचे नाव | |
| पत्ता | |
| संपर्क क्रमांक | |

आपला विश्वासू

सही:-

नाव:-

नाव पत्ता:-

मोबाईल नंबर

संस्थेचा शिक्का

# परिशिष्ट अ
# प्रतिज्ञापत्र

मी/ आम्ही याव्दारे नमुद करतो कि महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१)(ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहीती आहेत. आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येण्याऱ्या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसबंध किंवा आमच्याशी भागिदारी नाही.

कलम १६(१)(आय):- यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरक्त, नगरपालीकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपाकिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविधेत जिचा स्वता:चा किंवा आपल्या भागीमार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसबंद असेल.

कलम ४४ (१) (ब) :- पालीका सदस्य म्हणुन किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सद्यस्त म्हुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोटकलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसबंध असेल – मग अश्या हिश्श्याची किंवा हितसबंदाची किंमत काहिहि असो,- किंवा जीत त्याचा अशीलाच्या प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्यावतीने व्यावसायिक द्रुष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसबंद असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :- / /२०२६

**निविदा धारकाची सही**

साक्षीदाराचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :- / /२०२६

**साक्षीदाराची सही**



Signature Not Verified
Digitally signed by Dnyaneshwar Sheshrao Somware
Date: 2026.05.15 17:54:54 IST
Location: Maharashtra-MH